# भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर यांजकडून

## जाहीर नोटीस

भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३,चे कलम २१ (१)(४) अन्वये नोटीस

---

ज्या अर्थी बार्शी नगरपालिकेच्या मंजूर दुसरी सुधारित विकास योजना मधील, "नगरपरिषद कार्यालय ते कोठारी इमारत पर्यंत १२.० मी विकास योजना रस्ता रुंदीकरण" या प्रयोजनासाठी जागा संपादनाची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ सह भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३(यापुढे उक्त अधिनियम म्हणून संबोधिलेला) नुसार भूमि संपादन विशेष अधिकारी विशेष घटक सोलापूर या कार्यालयामार्फत सुरु आहे.

ज्या अर्थी उक्त अधिनियमाच्या कलम २१ नुसार संपादनाचे प्रयोजनामुळे बाधित जमिनी मध्ये हितसंबंध असलेल्या सर्व हितसंबंधित व्यक्तींना त्यांच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि अशा हितसंबंधाबद्दलच्या नुकसानभरपाई साठी त्यांच्या दाव्यांची रक्कम व त्याचा तपशील आणि जमिनीच्या केलेल्या मोजणीसंबंधी कोणताही आक्षेप असल्यास तो सादर करणेसाठी नोटीस बजाविणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी या कार्यालयाने उक्त अधिनियमाच्या कलम २१ (१) (४) अन्वये बजाविलेल्या नोटीसा सोबतचे यादीतील हितसंबंधितांना समक्ष अथवा डाक नोंदी पोच व्दारे बजाविलेल्या आहेत. तथापि सदरचे हितसंबंधित ज्ञात पत्यावर आढळून येत नाहीत.त्यामुळे सदर नोटीसा त्यांना प्राप्त झालेल्या नाहीत.**या व खाली नमूद प्रमाणे बाधित जमिनी मध्ये हितसंबंध असलेल्या सर्व हितसंबंधित व्यक्तींना ( बाधित क्षेत्रावर हितसंबंध धारण करणा- सह मालक/ भाडेकरु अथवा अन्य मार्गाने हितसंबंध असल्यास) या जाहीर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की**

---

ज्या अर्थी समूचित शासन म्हणजेच जिल्हाधिकारी सोलापूर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४) सह भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३, चे कलम १९ ची अधिसूचना खालील प्रमाणे प्रसिध्द केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासन राजपत्र | दिनांक : १९/०१/२०१७ |
| २ | दैनिक स्थानिक वृत्तपत्र | |
| | १. दै. सकाळ | दिनांक : ४/०१/२०१७ |
| | २. दै. केसरी | दिनांक : ४/०१/२०१७ |
| ३ | नगरपरिषद बार्शी कार्यालय | दिनांक : १८/०१/२०१७ |
| ४ | उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र.१ यांचे कार्यालय | दिनांक: १४/०६/२०१७ |
| ५ | तहसिलदार बार्शी यांचे कार्यालय | दिनांक :१९ /०१/२०१७ |
| ६ | समुचित शासनाचे वेब साईटवर | दिनांक : २३/०१/२०१७ |
| ७ | संपादनाअंतर्गत जागेवर | दिनांक : २३/०१/२०१७ |

त्या अर्थी उक्त नमूद घोषणेच्या अनुसूचीमध्ये, अधिसूचित केलेले मौ.बार्शी ता.बार्शी,जिल्हा सोलापूर येथील खाली नमूद यादीनुसार आपले नावासमोरील संपादित क्षेत्र बार्शी शहराच्या मंजूर विकास योजनेतील १२.०० मीटर रस्तारुंदीकरण (नगरपरिषद कार्यालय ते कोठारी इमारत) या सार्वजनिक प्रयोजनासाठी ताब्यात घेण्याचे शासनाने ठरविले आहे. या जमिनीमध्ये हितसंबंध असलेल्या हितसंबंधितांनी नुकसान भरपाईच्या अनुषंगाने त्यांचे म्हणणे **मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचे वतीने भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक सोलापूर यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.**

सबब वर नमूद केल्याप्रमाणे आपण स्वत: अथवा आपण प्राधिकृत केलेली व्यक्ती/वकील यांचे मार्फत समक्ष, भूमि संपादन विशेष अधिकारी,विशेष घटक, सोलापूर यांच्या डॉ.कोटणीस हॉल, पहिला मजला ,पार्क चौक सोलापूर येथील कार्यालयात, हे प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसांचे आत, कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे.

आपणास असेही कळविण्यात येते की, वर नमूद जमिनीच्या अनुषंगाने आपले सदर जमिनीत असलेल्या हितसंबंधाचे स्वरुप आणि त्या संबंधातील नुकसानभरपाईवर सांगितल्या जाणा-या दाव्याचा तपशील आणि उक्त अधिनियमाचे कलम २० अनुसार जागेच्या केलेल्या मोजणीबाबत कोणतेही आक्षेप असल्यास ते सादर करावेत.

वर नमूद हरकती अथवा म्हणणे हे लेखी स्वरुपात व आपण अथवा आपण प्राधिकृत केलेल्या व्यक्ती/वकील यांच्या स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.

बार्शी शहराच्या मंजूर विकास योजनेतील १२.०० मीटर रस्तारुंदीकरण (नगरपरिषद कार्यालय ते कोठारी इमारत) या प्रयोजनासाठी संपादित होण-या जागेचा तपशील ,ज्या हितसंबंधितांना कलम २१ (१)(४) अन्वये नोटीसा प्राप्त झालेल्या नाहीत अशा हितसंबंधित व्यक्तींचे नाव, संपादनात अंतर्गत क्षेत्र व ताब्यात घ्यावयाच्या जागेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | हितसंबंधितांचे नाव | संपादन करावयाच्या जागेचे | |
|---|---|---|---|
| | | नगर भूमापन क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
| १ | शशीकांत काशीनाथ केसकर | ४७ अ | ११.०० |
| २ | महेंद्र शरद पाटील | ४६ अ | १२.५० |
| ३ | हर्षद शरद पाटील | ४६ अ | १२.५० |
| ४ | श्रीमती रेखा शरद पाटील | ४६ अ | १२.५० |
| ५ | श्री माणिक भास्कर पंतोजी | ४३ | ४९.५० |
| ७ | भाडेकरु- हरीओम दुकान | ३८४/१ | ७४.०० |
| ८ | सौ.उज्वला भालचंद्र ठोंबरे | ३६६/२ | ६.२५ |
| ९ | सौ.पुष्पा भालचंद्र देशपांडे | ३६६/२ | ६.२५ |
| १० | सौ मंदा अनंत मोहोळकर | ३६६/२ | ६.२५ |

जा.क्र. भूसंविअ/विघ-सो/एस.आर.११/१६/बार्शी
दिनांक - ५ /१२/२०१७
ठिकाण- सोलापूर

(मो.बा.मंडवाले)
भूमि संपादन विशेष अधिकारी,
विशेष घटक,सोलापूर.

भूमि संपादन विशेष अधिकारी विशेष घटक, सोलापूर